डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

डॉ. सुरेंद्र रा. काळबांडे
कुलसचिव

Phone No.: 0724-2258372
E-Mail –registrar@pdkv.ac.in

महत्वाचे

राज्य माहिती आयोगाच्या सन २०१८ च्या तेराव्या वार्षिक अहवालातील शिफारशींचे अनुपालन करण्याबाबत.

वाचा : क्रमांक संकीर्ण-१५२२/प्र.क्र.१०/६-अे, दि. २५/०५/२०२२

परिपत्रक

क्र. बीएबी/माअअ/परिपत्रक/२०२२/३२९ दिनांक : १५ जून, २०२२

माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम २५ (१) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडून सन २०१८ चा तेरावा वार्षिक अहवाल विधिमंडळास सादर करण्यात आला आहे. सदर अहवालातील शिफारशी कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

त्याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व कार्यालय/ विभाग प्रमुख यांना सुचीत करण्यात येते की, आपले स्तरावर राज्य माहिती आयोगाकडून प्राप्त अहवालातील शिफारशींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. सदर शिफारशींचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय/ विभाग प्रमुखांची राहील.

सुलभ संदर्भास्तव शासन पत्र व राज्य माहिती आयोगाने केलेल्या शिफारशी विद्यापीठ संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येत आहेत.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने.

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रति,

....

....

....

प्रतिलिपी :

(१) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती यंत्रणा कक्ष, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक व सहपत्रित दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

(२) कुलगुरु यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता.

Officer in Charge, Agricultural Research System Cell, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 15/6/22
Dt.: 102

C/133

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

दूरध्वनी क्र.०२२-२२०२३११६
Email: desk6a.agri-mh@gov.in

दालन क्र.५३५, मंत्रालय विस्तार भवन
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०००३२

क्रमांक: संकीर्ण-१५२२/प्र.क्र.१०/६अे

दिनांक : २५.०५.२०२२

प्रति,

महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विषय – राज्य माहिती आयोगाच्या सन २०१८ च्या तेराव्या वार्षिक अहवालातील शिफारशींचे अनुपालन करण्याबाबत.

संदर्भ – कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२२/सं.क्र.९९/१२-अे, दि.३१.०३.२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भाधीन पत्राची प्रत सहपत्रासह सोबत जोडण्यात आहे.

राज्य माहिती आयोगाच्या सन २०१८ चा तेरावा वार्षिक अहवाल दि.२७.१२.२०२१ रोजी विधीमंडळास सादर करण्यात आला असून सदर अहवालातील शिफारशींनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन त्यासंदर्भातील अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपली,

(रंजना गवारी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत-वरीलप्रमाणे

O/o. REGISTRAR
No. R/105
Dt. 30/5/22
Dr. P.D.K.V., Akola

कार्यालय
उपकुल सचिव (आस्था)
आवक विभाग
डॉ. पं. द. कृ. वि. अकोला

प्रकरण क्र. ५

सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास केलेल्या शिफारशी

५ या पूर्वीच्या वार्षिक अहवालातील ठळक शिफारशी खालीलप्रमाणे :—

५.१ राज्य माहिती आयोगाच्या सन २००६ च्या अहवालातील शिफारशी—

द्वितीय अपिलाची सुनावणी घेत असताना. राज्य माहिती आयुक्तांच्या निदर्शनास आलेल्या बाबींच्या आधारे राज्य माहिती आयोगाच्या. राज्य विधान मंडळास यापूर्वी सादर केलेल्या विविध वार्षिक अहवालांमध्ये (प्रकरण ५ मध्ये) शासनास शिफारशी केल्या आहेत.

५.२ राज्य माहिती आयोगाच्या सन २००७ च्या अहवालातील शिफारशी—

(१) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कारणमिमांसा देऊन निर्णय देण्याबाबत सूचना निर्गमित करणे.

(२) छायांकित प्रती व प्रमाणित प्रती देण्यासंदर्भात स्पष्टीकरणात्मक परिपत्रक काढणे.

(३) प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे.

(४) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांच्याकडील जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची माहिती असणारी पुस्तिका प्रसिद्ध करण्याबाबत सूचना देणे.

(५) अभिलेख्यांची सूची करण्याबाबत निदेश देणे.

(६) सार्वजनिक प्राधिकरणांकडील योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च, अर्थसंकल्पीय तरतूदी, प्रत्यक्ष खर्च याचा अहवाल कलम ४ अन्वये जनतेस सहजतेने उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावरून आदेश देणे.

(७) राज्य सरकारतर्फे निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणावर वित्त पुरवठा केला जातो अशा अशासकीय संस्थांची यादी प्रसिद्ध करणे.

(८) कलम २७ प्रमाणे नियम प्रसिध्द करणे.

(९) तक्रार निर्णयाबाबत नियम तयार करणे.

(१०) आयोगाच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देणे.

५.३ राज्य माहिती आयोगाच्या सन २००८ च्या अहवालातील शिफारशी -

(१) अभिलेखे सुचीबद्ध करणे व संगणकीकरण करण्यायोग्य अभिलेख्यांचे संगणकीकरण करणे.

(२) नियमांची मानके कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत.

(३) अधिनियमाच्या कलम २ (अ) प्रमाणे कोणती माहिती मागता येते व कोणती माहिती मागता येत नाही याचे विश्लेषण प्रसिद्ध करणे.

(४) माहिती मिळण्याकरता प्रसिध्द केलेले अतिरिक्त नियम, मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध करणे.

(५) आयोगाच्या आदेशाचा अवमान झाल्यास शास्ती होऊ शकते याची स्पष्ट कल्पना देणारे परिपत्रक काढणे.

(६) योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत शासन आदेश काढणे.

(७) प्रथम अपिलावरील निर्णय देताना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावरील निर्णयात माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत विश्लेषण करण्याचे शासन स्तरावरून आदेश देण्याबाबत.

Scanned with CamScanner

25/05/2022, 18:09

५.४ राज्य माहिती आयोगाच्या सन २००९ च्या अहवालातील शिफारशी -

(१) कलम ४ ची अंमलबजावणी गंभीरपणे करणे.

(२) कलम १९ (१) अन्वये केलेल्या प्रथम अपिलावर कशाप्रकारे निर्णय घ्यावा याबाबत शासनस्तरावर परिपत्रक काढणे.

(३) वन हक्क व जलस्व राज्य समितीकडील योजनांशी संबंधित माहिती देण्यासाठी ग्रामसेवकांची जनमाहिती अधिकारी म्हणून नेमणूक करणे.

(४) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतुदींचे पालन करण्याबाबत.

(५) प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून किमान नायब तहसीलदार दर्जाचे अधिकारी नेमण्याबाबत.

(६) दारिद्र्य रेषेखालील अर्जदारांना जास्तीत जास्त ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याबाबत.

(७) अनुदानित शाळांतील मुख्याध्यापकांना माहिती अधिकारांतर्गत माहिती देण्याचे निदेश देण्याबाबत.

५.५ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१० च्या अहवालातील शिफारशी -

(१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेली द्वितीय अपीले निकाली काढण्यासाठी कार्यपद्धती विहित करणे.

(२) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(१)(ख) प्रमाणे आणि महाराष्ट्र राज्य शासनाचे परिपत्रक क्रमांक केंमाअ. २००८/८७०/प्र.क्र. ३००/सहा, दिनांक १३/५/२००९ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या पत्र व्यवहारावर जनमाहिती अधिकाऱ्याचा तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा पूर्णपत्ता (नावासहित), पदनाम, दूरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी. इत्यादी बाबी नमूद करण्याबाबत पुन्हा निदर्शनास आणणे.

(३) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) नुसार ३० दिवसांच्या आत अर्जदारास माहिती उपलब्ध करून दिली नाही तर कलम ७(६) नुसार अर्जदाराने मागितलेली माहिती मोफत पुरविण्यासंदर्भात कागदपत्रांच्या छाया प्रतींसाठी येणारा खर्च संबंधित जनमाहिती अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याबाबत शासनस्तरावर निर्णय घेणे.

(४) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) किंवा १९(२) अन्वये प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने अपील मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत निकाली न काढल्यास कलम १९(६) प्रमाणे विलंबाने प्रकरण निकाली काढताना झालेल्या उशिराबाबतची कारणे नमूद करणे, अन्यथा प्रशासकीय कारवाई करणे.

(५) अर्जदाराने माहिती प्राप्त करण्यासाठी भरलेली रक्कम त्याच कामासाठी कशी वापरता येईल व ती वापरण्यासाठी कोणती कार्यपद्धती कार्यान्वित करता येईल, याचा शासनस्तरावर विचार करणे.

(६) माहितीच्या अधिकारात अर्जदाराने साक्षांकित अनेक प्रतींची मागणी केल्यास माहिती शुल्काचे दर नव्याने निश्चित करावेत जेणेकरून साक्षांकित प्रतींच्या मोबदल्यात शासनास महसूल उपलब्ध होऊ शकेल.

(७) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत शासनाचे निर्णय तसेच परिपत्रके ग्रामपातळीपर्यंत पोहोचतील याची खात्री करणे.

५.६ राज्य माहिती आयोगाच्या सन २०११ च्या अहवालातील शिफारशी -

(१) कलम ४ ची अंमलबजावणी गांभीर्याने करणे.

(२) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार अभिलेख सूचिबद्ध करणे व संगणकीकरण करणे.

(३) आयोगाच्या आदेशांचे अनुपालन विहीत मुदतीत करणे.

ए

Scanned with CamScanner

(४) दारिद्र्यरेषेखालील अर्जदारांना किती पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य पुरवावी याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता.

(५) योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत शासन आदेश काढणे.

(६) प्रथम अपिलावर विहीत मुदतीत निर्णय घेणे.

५.७ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१२ च्या अहवालातील शिफारशी :---

(१) शासकीय कामकाजामध्ये सुधारणा व कामकाजाची माहिती होण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षा (Departmental Qualification Examination) घेण्यात येतात. या परीक्षांच्या अभ्यासक्रमामध्ये :

- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
- महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख, २००५
- महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करणेस प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ चे प्रकरण ३ या विषयांचा समावेश करावा. [कलम २७ (२)(च) नुसार समुचित शासनाला अधिकार]

(२) नागरिकाने माहितीचा अर्ज केल्यास व त्याला माहिती ई-मेलवर हवी असल्यास माहितीच्या प्रती स्कॅन करून माहिती ई-मेलवर देण्याची तरतूद नियमात करण्यात यावी.

- त्यामुळे वेळ व पैसा वाचेल
- कार्यालये ई-गव्हर्नन्सचा वापर करण्यास सुरूवात करतील
- सध्या बहुतेक कार्यालयात माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती पाठविण्यासाठी पोस्टेजला निधी उपलब्ध नसतो.
- नागरिकाने भरलेले शुल्क लेखाशीर्षावर जमा होते ते काढता येत नाही.
- त्यामुळे माहिती प्रकट करण्याच्या प्रक्रियेत अनेक अडचणी जनमाहिती अधिकाऱ्यांपुढे असतात.
- केवळ सहजपणे स्कॅन करणे शक्य असलेले, तसेच संगणकावर उपलब्ध असणारी माहिती अशी ई-मेलवर मोफत देण्याची सुरूवात केल्यास माहिती प्रकट करण्याच्या प्रक्रियेलाही वेग येईल व कार्यालयावरचा ताणही कमी होईल.

(३) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांतील प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांवर प्रथम अपिलाची सुनावणी योग्य पद्धतीने घेण्याचे बंधन घालून त्यांना सुनावणीची पद्धत, सुनावणीसाठी द्यावयाची सुस्पष्ट नोटीस, सुस्पष्ट आदेश व आदेशाची प्रत नागरिकांस तात्काळ देण्याची पद्धत इ. बाबतीत नियम करून प्रशिक्षणाची सक्ती करणे.

(४) सर्व प्राधिकरण प्रमुखांना म्हणजेच खाते प्रमुखांना खालील बाबींसाठी जबाबदार ठरवणे व या बाबी त्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल तसेच Annual Performance Report शी निगडीत करणे.

(५) माहितीच्या अधिकार अधिनियमातील कलम ४ची अंमलबजावणी.

(६) महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ चे प्रकरण ३ची (नागरिकांची सनद) अंमलबजावणी.

(७) सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वरील दोन अधिनियम व अभिलेख व्यवस्थापनाचे प्रशिक्षण.

Scanned with CamScanner

(८) प्रत्येक कार्यालयात अभिलेख कक्ष उभारणे व अभिलेखापाल नेमला नसेल तिथे अभिलेखापाल पदनिर्देशित करण्यास सक्ती करणे.

(९) वरील तीनही अधिनियमांची अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर विभाग प्रमुख, खाते प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांचा क्रीयाशील सहभाग असणे आवश्यक आहे.

(१०) अभिलेख व्यवस्थापनाविषयी सर्व कार्यालये व कर्मचाऱ्यांमध्ये अनास्था दिसून येते. त्यामुळे माहिती देताना व तिचा शोध घेताना अडचणी निर्माण होऊन कर्मचाऱ्यांचा वेळ व श्रम माहिती शोधण्यात जातो. हे टाळण्यासाठी प्रत्येक कार्यालयाच्या अभिलेखाची तपासणी (Audit) अभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत करण्यास सक्ती करण्यात यावी.

(११) माहितीच्या अर्ज व अपिलांबाबत कार्यालयात स्वतंत्र टपाल व्यवस्था करण्याचे सुचविणे

(१२) कलम-४च्या अंमलबजावणीसाठी सर्व कार्यालय प्रमुखांना कलम-४ चे प्रशिक्षण अनिवार्य करावे. सदरचे प्रशिक्षण त्यांनी पूर्ण केल्याचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करण्यास सक्ती करावी.

(१३) कार्यालयास अथवा विभागास माहिती अधिकार अर्जांचे, अपिलांचे व तक्रारींचे प्रमाण जास्त असेल तिथल्या कार्यालयाचे कलम-४ चे त्यांच्या प्रचार व प्रसाराबाबतची तपासणी (Audit) यंत्रणेमार्फत करून त्याचा अहवाल राज्य माहिती आयोगास पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी. [कलम-१९ (८)(क)(६) नुसार] माहितीच्या अर्ज व अपिलांबाबत कार्यालयात स्वतंत्र टपाल व्यवस्था करण्याचे सुचविले.

(१४) बऱ्याचशा सार्वजनिक प्राधिकरणांनी अतिशय कनिष्ठ स्तरावरच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी नेमलेले असल्याने ज्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे त्यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद वरिष्ठांकडून त्यांना मिळत नाही. यास्तव, जेष्ठता असलेल्या अधिकाऱ्यांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणे योग्य राहील.

(१५) जन माहिती अधिकाऱ्यांचे पद निर्देशन करताना, कार्यालयातील सर्वसाधारणपणे कामाचा पुरेसा अनुभव व दर्जा असणाऱ्या अधिकाऱ्यालाच जन माहिती अधिकारी करणे आवश्यक आहे. असे निदर्शनास येते की, वरिष्ठ अधिकारी ही जबाबदारी कनिष्ठातले कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांच्यावर ढकलून स्वत: नामानिराळे राहाण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

५.८ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१३ च्या अहवालातील शिफारशी :

(१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-७(५) अन्वये दारिद्रय रेषेखालील व्यक्तींकडून कोणतीही फी आकारण्यात येत नाही. मात्र,आता या प्रकरणांमध्ये बऱ्याचशा सार्वजनिक प्राधिकरणांना अनेक अडचणी येत आहेत. यास्तव, यापूर्वी जे अर्जदार दारिद्रयरेषेखाली येत आहेत त्यांना ५० पृष्ठांपर्यंत मोफत माहिती देण्यात यावी व त्यानंतर त्यांचेकडून विहित शुल्क आकारण्यात यावे,अशी शिफारस करण्यात आली होती. या शिफारशींचा पुनरुच्चार करण्यात येत असून शासनाने याबाबत कलम-२७ नूसार आदेश निर्गमित करावेत, अशा सूचना करण्यात येत आहेत.

(२) ज्या प्रकरणा मध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी आयोगाचे आदेशानुसार शास्तीची वसुली केलेली नाही किंवा शिस्तभंगाची कारवाई सुरू केलेली नाही अशा सार्वजनिक प्राधिकरणां विरुद्ध योग्य ती कारवाई शासनाने करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

(४) दारिद्रयरेषेखालील अर्जदारांना किती पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य पुरवावी यावावत शासनाने योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता.

(५) योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यावावत शासन आदेश काढणे.

(६) प्रथम अपिलावर विहीत मुदतीत निर्णय घेणे.

५.७ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१२ च्या अहवालातील शिफारशी :---

(१) शासकीय कामकाजामध्ये सुधारणा व कामकाजाची माहिती होण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षा (Departmental Qualification Examination) घेण्यात येतात. या परीक्षांच्या अभ्यासक्रमामध्ये :

- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
- महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख, २००५
- महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करणेस प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ चे प्रकरण ३ या विषयांचा समावेश करावा. [कलम २७ (२)(च) नुसार समुचित शासनाला अधिकार]

(२) नागरिकाने माहितीचा अर्ज केल्यास व त्याला माहिती ई-मेलवर हवी असल्यास माहितीच्या प्रती स्कॅन करून माहिती ई-मेलवर देण्याची तरतूद नियमात करण्यात यावी.

- त्यामुळे वेळ व पैसा वाचेल
- कार्यालये ई-गव्हर्नन्सचा वापर करण्यास सुरूवात करतील
- सद्या बहुतेक कार्यालयात माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती पाठविण्यासाठी पोस्टेजला निधी उपलब्ध नसतो.
- नागरिकाने भरलेले शुल्क लेखाशीर्षावर जमा होते ते काढता येत नाही.
- त्यामुळे माहिती प्रकट करण्याच्या प्रक्रियेत अनेक अडचणी जनमाहिती अधिकाऱ्यांपुढे असतात.
- केवळ सहजपणे स्कॅन करणे शक्य असलेले, तसेच संगणकावर उपलब्ध असणारी माहिती अशी ई-मेलवर मोफत देण्याची सुरूवात केल्यास माहिती प्रकट करण्याच्या प्रक्रियेलाही वेग येईल व कार्यालयावरचा ताणही कमी होईल.

(३) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांतील प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांवर प्रथम अपिलाची सुनावणी योग्य पद्धतीने घेण्याचे बंधन घालून त्यांना सुनावणीची पद्धत, सुनावणीसाठी द्यावयाची सुस्पष्ट नोटीस, सुस्पष्ट आदेश व आदेशाची प्रत नागरिकांस तात्काळ देण्याची पद्धत इ. बाबतीत नियम करून प्रशिक्षणाची सक्ती करणे.

(४) सर्व प्राधिकरण प्रमुखांना म्हणजेच खाते प्रमुखांना खालील बाबींसाठी जबाबदार ठरवणे व या बाबी त्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल तसेच Annual Performance Report शी निगडीत करणे.

(५) माहितीच्या अधिकार अधिनियमातील कलम ४ची अंमलबजावणी.

(६) महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ चे प्रकरण ३ची (नागरिकांची सनद) अंमलबजावणी.

(७) सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वरील दोन अधिनियम व अभिलेख व्यवस्थापनाचे प्रशिक्षण.

Scanned with CamScanner

C|141

(३) नागरिकांनी भरलेले शुल्क लेखाशिर्षाखाली जमा होते व ते काढता येत नसल्याने अनेक सार्वजनिक प्राधिकरणांना मात्र समस्यांना तोंड द्यावे लागते. यावर उपाय म्हणून जिल्हा अधिकारी यांचे स्तरावर ए पी.एल.ए. अकाऊंट उघडून संपूर्ण जिल्ह्यातील जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील अर्जदारांकडून जमा होणारी रक्कम या पी.एल.ए. अकाऊंट मध्ये जमा करावी व यातून जिल्हा अधिकारी यांनी काही विशिष्ट प्रकरणांमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना निधी वाटप करण्याचे अधिकार देण्यात यावेत.

(४) ज्या प्रकरणांमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम-४(१) (क) व (ख)चे पालन केलेले नाही त्यासंबंधित विभागांच्या सचिवांना जबाबदार धरण्यात यावे.

(५) अलिकडेच महाराष्ट्र राज्यात मोठ्याप्रमाणावर माहिती अधिकार अधिनियमाचे काम करीत असलेल्या कार्यकर्त्यांवर हल्ले झाले असून काहींचे खून देखील करण्यात आलेले आहेत, ही बाब अतिशय गंभीर असून आयोगाने शासनाला (मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन) (पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य)अशा प्रकरणात त्वरित कार्यवाही करण्याचे व प्रत्येक प्रकरणातील गुणवत्तेनुसार कार्यकर्त्यांना पोलिससंरक्षण देण्याबाबत गांभिर्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(६) ज्या सार्वजनिक प्राधिकरणांकडे मोठ्या प्रमाणात माहिती अधिकार अधिनियमाचे अर्ज येतात त्यांच्याबाबत विशेषअधिकारी, कर्मचारी वर्गने मून त्यांना योग्य ती साधनसामग्री व कार्यालयीन खर्चाकरिता आकस्मिकता निधी (Contingency Fund) देण्यात यावा.

(७) आयोगामध्ये १३६ एवढी पदे असून त्यापैकी ४४ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्यासाठी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असला तरी अद्यापि पुरेसा कर्मचारी वर्ग दिलेला नाही. शासनाने रिक्त पदे त्वरित भरावी तसेच माहिती आयुक्तांचे एक पद रिक्त आहे ते त्वरित भरावे.

५.९ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१४ च्या अहवालातील शिफारशी :-

सन २००६ पासून २०१३ पर्यंतच्या वार्षिक अहवालांत सुमारे ६० शिफारशी आयोगाने केल्या असून या सूचनांच्या अंमलबजावणीबाबत फारशी प्रगती शासनाकडून झालेली नाही. यास्तव, या अहवालात आणखी शिफारशी करण्याची आवश्यकता नाही. आयोग अशी अपेक्षा करीत आहे की, वरील सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही शासनाकडून तातडीने करण्यात येईल.

५.१० राज्य माहिती आयोगाच्या सन २०१५ च्या अहवालातील शिफारशी :-

मागील वर्षाच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे चालू वर्षाच्या अहवालात देखील नवीन शिफारशी करण्याची आवश्यकता नाही. आयोग अशी अपेक्षा करीत आहे की, वरील सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही शासनाकडून तातडीने करण्यात येईल.

५.११ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१६ च्या अहवालातील शिफारशी :-

मागील वर्षाच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे चालू वर्षाच्या अहवालात देखील नवीन शिफारशी करण्याची आवश्यकता नाही. आयोग अशी अपेक्षा करीत आहे की, वरील सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही शासनाकडून तातडीने करण्यात येईल.

Scanned with CamScanner

.१२ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१७ च्या अहवालातील शिफारशी :

(१) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी/विभागांनी कलम ४ ची अंमलबजावणी गंभीरपणे करणे.

(२) प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे.

(३) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार अभिलेख सूचिबद्ध करणे व संगणकीकरण करणे.

(४) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत शासनाचे निर्णय तसेच परिपत्रके ग्रामपातळीपर्यंत पोहोचतील याची खात्री करणे.

(५) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तक्रार निर्णयाबाबत नियम तयार करणे.

(६) नियमांची मानके कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत निर्देश देणे.

(७) दारिद्र्य रेषेखालील अर्जदारांना जास्तीत जास्त ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याबाबत नियम करणे.

(८) अर्जदाराने माहिती प्राप्त करण्यासाठी भरलेली रक्कम त्याच कामासाठी कशी वापरता येईल व ती वापरण्यासाठी कोणती कार्यपद्धती कार्यान्वित करता येईल, याचा शासन स्तरावर विचार करणे.

(९) अभिलेख व्यवस्थापनाविषयी सर्व कार्यालये व कर्मचाऱ्यांमध्ये अनास्था दिसून येते. त्यामुळे माहिती देताना व तिचा शोध घेताना अडचणी निर्माण होऊन कर्मचाऱ्यांचा वेळ व श्रम माहिती शोधण्यात जातो. हे टाळण्यासाठी प्रत्येक कार्यालयाच्या अभिलेखाची तपासणी (Audit) अभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत करण्यास सक्ती करण्यात यावी.

(१०) राज्य माहिती आयोगाची तीन अतिरिक्त खंडपीठे मुंबई, पुणे व औरंगाबाद येथे स्थापन करण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करणे.

(११) शासनाकडून मुख्यालय व बृहन्मुंबई खंडपीठ तसेच राज्यातील उर्वरित सर्व खंडपीठ याठिकाणी रिक्त असलेल्या जागांवर अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करणे.

(१२) यापूर्वीच्या अहवालातून राज्य माहिती आयोगाने केलेल्या ज्या शिफारशींवर अद्यापही शासनाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही, अशा सर्व शिफारशींवर कार्यवाही करणे.

५.१३ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१८च्या अहवालातील शिफारशी :

(१) नागरिकांनी भरलेले शुल्क लेखा शिर्षाखाली जमा होते व ते काढता येत नसल्याने अनेक सार्वजनिक प्राधिकरणांना मात्र समस्यांना तोंड द्यावे लागते. यावर उपाय म्हणून जिल्हाधिकारी यांचे स्तरावर एक पी.एल.ए.अकाऊंट उघडून संपूर्ण जिल्ह्यातील जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील अर्जदारांकडून जमा होणारी रक्कम या पी.एल.ए.अकाऊंटमध्ये जमा करावी व यातून जिल्हा अधिकारी यांनी काही विशिष्ट प्रकरणांमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना निधी वाटप करण्याचे अधिकार देण्यात यावेत.

(२) ज्या प्रकरणांमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम -४ (१) (क) व (ख) चे पालन केलेले नाही त्या संबंधित कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात यावे.

(३) अलीकडेच महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणावर माहिती अधिकार अधिनियमाचे काम करीत असलेल्या कार्यकर्त्यांवर हल्ला झाले असून काहींचे खुन देखील करण्यात आलेले आहेत, ही बाब अतिशय गंभीर असून आयोगाने शासनाला (मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन) (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य) अशा प्रकरणात

Scanned with CamScanner

about:blank

C|143

त्वरित कार्यवाही करण्याचे प्रत्येक प्रकरणातील गुणवत्तेनुसार कार्यकर्त्यांना पोलीस संरक्षण देण्याबाबत गांभिर्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(४) वेळोवेळी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करावे. असे असताना नवनवीन प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणांचा लाभ देणे.

(५) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार अभिलेख सूचिबद्ध करणे व संगणीकरण करणे.

(६) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत शासनाचे निर्णय तसेच परिपत्रके ग्रामपातळीपर्यंत पोहोचतील याची खात्री करणे. यासंदर्भातील सर्व शासन निर्णय / परिपत्रके यांचा सारसंग्रह शासनाने प्रकाशित करावा.

(७) अभिलेख व्यवस्थापनाविषयी सर्व कार्यालये व कर्मचाऱ्यांमध्ये अनास्था दिसून येते. त्यामुळे माहिती देताना व तिचा शोध घेताना अडचणी निर्माण होऊन कर्मचाऱ्यांचा वेळ व श्रम माहिती शोधण्यात जातो. हे टाळण्यासाठी प्रत्येक कार्यालयाच्या अभिलेखाची तपासणी (Audit)अभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत करण्यास सक्ती करण्यात यावी.

(८) राज्य माहिती आयोगाची तीन अतिरिक्त खंडपीठे मुंबई, पुणे व औरंगाबाद येथे स्थापन करण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करणे.

(९) शासनाकडून मुख्यालय व बृहन्मुंबई खंडपीठ तसेच राज्यातील उर्वरित सर्व खंडपीठ या ठिकाणी रिक्त असलेल्या जागांवर अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करणे.

(१०) यापूर्वीच्या अहवालातून राज्य माहिती आयोगाने केलेल्या ज्या शिफारशींवर अद्यापही शासनाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही, अशा सर्व शिफारशींवर कार्यवाही करणे.

Scanned with CamScanner